# प्रसिध्दी निवेदन

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS) 2017-18.

परीक्षा दिनांक 03 डिसेंबर 2017

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-1 मार्फत राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS) इ. 08 वी साठी दिनांक 03 डिसेंबर 2017 रोजी महाराष्ट्रात एकूण 288 केंद्रावर घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेसाठी महाराष्ट्रातून एकूण 6270 शाळा व एकूण 79392 विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आलेली आहे.

शाळांना विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे परिषदेच्या www.mscepune.in व http://nmms.mscescholarshipexam.in या संकेतस्थळावर दिनांक 23 नोव्हेंबर 2017 पासून उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. शाळांनी शाळेचे लॉगीन करुन विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे काढावयाची आहेत.

सदर प्रवेशपत्रे विद्यार्थ्यांस काढून देण्याची जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांची असेल. प्रवेशपत्रावर संबंधित मुख्याध्यापकांनी स्वाक्षरी करावयाची आहे. जर एखाद्या प्रवेशपत्रावर विद्यार्थ्यांचा फोटो नसेल तर मुख्याध्यापकांनी सदर विद्यार्थ्याचा फोटो दिलेल्या चौकटीत चिकटवून त्यावर स्वाक्षरी करावी. शाळांना/विद्यार्थ्यांना काही अडचणी असल्यास त्यांनी संबंधित परीक्षा केंद्रसंचालक, शिक्षणाधिकारी (माध्य.) किंवा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -1 यांचेकडे संपर्क साधावा.

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे दुरध्वनी क्रमांक** **020-26123066**
**020-26123067**

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-1.